प्रेसनोट **दिनांक १६/११/२०२६**

नारपोली पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी केलेल्या आरोपीताना शिताफीने अटक करून घरफोडी केलेला मुद्देमाल हस्तगत केले बाबत.

दिनांक १२/११/२०२६ रोजी फिर्यादी श्री अभिनंदन तखत्मल पिछोलीया, राह भांडुप, वेस्ट, मुंबई यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली की, दिनांक ०५/११/२०२६ रोजी १६:०० वा. ते दिनांक १२/११/२०२६ रोजी सकाळी ०६:४५ वा. चे दरम्यान गोडावुन नं. ७४५/१, राहनाळ ग्रामपंचायत रोड, सदगुरू कंम्पाउड, होलीमेरी स्कुलच्या जवळ, राहनाळ, ता. भिवंडी, जि. ठाणे याठिकाणी अज्ञात इसमाने त्यांच्या गोडावुनचे लोखंडी जाळीचे व शटरचे लॉक तोडुन आत प्रवेश करून १४,४४,०००/— रू. किमंतीचे लिड मेंडल, बिसमत मेटल, सोल्डर मेटल व डि.व्ही.आर. घफोडी चोरी केला म्हणुन दिलेल्या तक्रारी वरून नारपोली पो.स्टे. गुन्हा रजि. नं. १३४९/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४), ३(५) प्रमाणे दिनांक दि. १२/११/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखून तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदाराच्या आधारे तपास करून ०२ दिवसाच्या आत आरोपीताचा ठावठिकाणा बाबत माहिती प्राप्त करून आरोपीत नामे १) शौकत उर्फ वसीम अकबरअली खान, वय २८ वर्षे, राह कौसा, मुब्रा, जि. ठाणे, २) अब्दूल हासिम वदुत खान, वय ३८ वर्षे, राह उल्हासनगर नं. ५, ठाणे, ३) गयासुद्दीन सलाहुद्दीन चौधरी, वय २१ वर्षे, राह कौसा, मुब्रा, जि. ठाणे, ४) सलमान शाबान अली खान, वय ३३ वर्षे, राह मुब्रा, जि. ठाणे, ५) अंबिया सजाउद्दीन मिर्झा, वय ३२ वर्षे, राह मुब्रा, जि. ठाणे यांना शिताफिने सदर गुन्हयात अटक केली. नमूद आरोपीत यांच्याकडे कौशल्याने तपास करून सदर आरोपीतानी घरफोडी चोरी करण्यासाठी वापरलेले टेम्पो तसेच रूपये १४,३७,०००/— किमंतीचे लिड मेटल, बिसमत मेटल, सोल्डर मेटल असा एकूण २४,८७,०००/— रूपये किमंतीचा मुद्देमाल हस्तगत केला. नमुद गुन्हयाचा पुढील तपास पोउपनिरी आकाश पवार हे करीत आहेत.

सदरची कामगिरी डॉ. श्री. पवन बनसोड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, भिवंडी, श्री. सचिन सांगळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, पुर्व विभाग, भिवंडी यांचे मार्गदर्शनाखाली नारपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय कादबाने, पोलीस निरीक्षक श्री. अतुल अडुरकर यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकाचे अधिकारी सपोनिरी/महेंद्र पाटील, पोउपनिरी/आकाश पवार व गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार पो.हवा/४६५७ चव्हाण, पो.हवा/५१९३ हुंडेकरी, पो.हवा/१४० गुंजाळ, पो.हवा/३३७४ भामरे, पो.हवा/१७०९ तडवी, पो.हवा/७११९ सुरळकर, पो.हवा/४४६५ शिंदे, पो.हवा/२८८० मथे, पोशि/४१९५ देसले, पोशि/२४६८ ताठे यांनी पार पाडली आहे.